# साधना स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घेतली सायबर सुरक्षेची शपथ

## यशोदा संस्था आणि क्विक हिल फाउंडेशनतर्फे जनजागृती मोहीम

**सातारा, दि. २१ (प्रतिनिधी)** - येथील यशोदा शिक्षण संस्थेच्या साधना इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेविषयी सामूहिक शपथ घेतली. यशोदा टेक्निकल कॅम्पस व क्विक हिल फाउंडेशन यांच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पात गणेश राणे व अनिकेत यांनी शपथ दिली.

सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या विद्यार्थ्यांनाही आपल्या जाळ्यात अडकवत आहेत. त्यामुळे यशोदा टेक्निकल कॅम्पस व क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. लहान मुले ऑनलाइन गेम खेळतात. त्या माध्यमातून माहिती गोळा केली जाते. डमी यूजर्स क्रिएट केले जातात. त्यामुळे शाळांमध्ये शिबिरे घेऊन, मुले आणि पालकांना समजावण्यात येणार आहे. मोबाइल गेम खेळताना कोणती काळजी घ्यावी, काय करावे आणि काय करू नये, याची माहिती देण्यात येणार आहे. मुले हक्काने मोबाइल मागतात. एक तास अभ्यास केला आहे. आता अर्धा तास मोबाइल खेळू द्या, असे सांगतात. त्यामुळे ऑनलाइन गेम्सचे प्रमाण वाढले आहे. एखादा यूजर आठव्या वर्गात असेल. तर दुसरा मीही तुझ्याच वयाचा आहे, तुझे आई-वडील काय करतात? आर्थिक उत्पन्न किती आहे? तुझे पालक परदेशात गेले होते का? कार कोणती आहे, अशी माहिती गोळा केली जाते. व्हॉटसॲपवर नंबर शेअर केले जातात. हळूहळू वैयक्तिक माहिती घेऊन, लहान मुलांना जाळ्यात ओढले जाते, असे अजित पारसे यांनी सांगितले.



**सातारा : सायबर सुरक्षेविषयी माहिती देताना तज्ज्ञ.**

### क्रिप्टोकरन्सीच्या नावाने लूट

काही वेळा क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करा, पैसे डबल करून देतो, असे सांगून फसवणूक केली जाते. डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड नंबर, पासवर्ड, ओटीपी मागून रक्कम लुटली जाते. घरबसल्या काम करायची संधी देत असल्याचे सांगून लूट केली जाते. हे लुटारू लोकांना व्हॉटसॲप किंवा टेलिग्रामवर मेसेज करून, घरबसल्या काम करण्याची संधी उपलब्ध करून देत असल्याचे सांगतात. लोकांना कामाबद्दल माहिती दिली जाते. एखादे यूट्यूब चॅनेल सबस्क्राइब करा, व्हिडिओ लाइक करा. प्रत्येक यूट्यूब चॅनेलला सबस्क्राइब केल्यानंतर ५० रुपये देणार असल्याचे ते सांगतात. काही वेळा फूड ॲपला फीडबॅक देणे, तर काही वेळा विविध ॲप्सना स्टार रेटिंग देणे, अशी कामे सांगितली जातात. त्यामुळे सायबर सुरक्षा महत्त्वाची आहे, असे सांगून तज्ज्ञांनी सायबर सुरक्षेची सखोल माहिती देण्यात आली. क्विक हिल फाउंडेशनच्या या उपक्रमाचे ग्रामस्थ व शाळेच्या शिक्षकांनी कौतुक केले.